**प्रसिध्दी पत्रक** **दिनांक** 25/02/2026

**आरोपी खाजगी इसम** - श्री. नंदकिशोर आसाराम चव्हाण - सेवानिवृत- कनिष्ठ सहाय्यक, पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद कार्यालय, ता. जि. छत्रपती संभाजीनगर (खाजगी ईसम ) यांनी तक्रारदार यांचेकडुन 10,000/- रुपये लाच स्विकारल्याने आरोपी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळ्यात.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | पोलीस ठाणे क्रांतीचौक, छत्रपती संभाजीनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे. |
| आलोसे यांचे नाव व पत्ता | श्री. नंदकिशोर आसाराम चव्हाण वय 61 वर्ष व्यवसाय - सेवानिवृत- कनिष्ठ सहाय्यक, पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद कार्यालय, ता. जि. छत्रपती संभाजीनगर (खाजगी ईसम ) रा. नौकार यश हौसिंग सोसायटी, फ्लॅट नंबर 13, पोलीस कॉलनी पडेगाव ता. जि. छत्रपती संभाजीनगर |
| लाच मागणी रक्कम | 14,000/- (चौदा हजार रुपये) |
| लाच स्विकृती रक्कम | 10,000/- (दहा हजार रुपये) |
| सापळा अधिकारी<br>तपास अधिकारी | श्री.चैनसिंग गुसिंगे, पोलिस निरीक्षक, ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर.<br>श्री. शांतीलाल चव्हाण, पोलिस निरीक्षक, ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर. |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार व त्याचा मित्र यांना जिल्हा परिषद कार्यालय येथील बांधकाम विभागातून जिल्हा परिषद विभागामार्फत निघणारे शासकीय कामाची गुत्तेदारी / ठेकेदारी मिळण्याकरिता लागणारे नोंदणी प्रमाणपत्र ( लायसन ) काढून देण्याकरिता. |
| थोडक्यात माहिती | दिनांक 25/02/2026 रोजी पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी केली असता, यातील आरोपी नंदकिशोर चव्हाण यांनी तक्रारदार व त्याचा मित्र याला जिल्हा परिषद कार्यालय येथील बांधकाम विभागातून जिल्हा परिषद विभागामार्फत निघणारे शासकीय कामाची गुत्तेदारी / ठेकेदारी मिळण्याकरिता लागणारे नोंदणी प्रमाणपत्र ( लायसन ) काढून देण्याकरिता नंदकिशोर चव्हाण यांनी जिल्हा परिषद कार्यालयातील वरिष्ठाचे प्रभाव पाडून तक्रारदार आणि त्याचा मित्र यांच्या दोन्ही फाईलचे मिळून प्रत्येकी 7,000/- रुपये असे 14,000/- हजार रुपयांची लाच मागणी करून, तडजोडी अंती दोन्ही फाईलचे प्रत्येकी 5,000/- हजार असे एकूण 10,000/- रुपये स्वतः स्वीकारण्याचे पंचांसमक्ष मान्य केले.<br>आरोपी खाजगी इसम यांच्या लाचमागणी नंतर दिनांक 25/02/2026 रोजी शासकीय पंच समक्ष सापळा कारवाई दरम्यान जिल्हा परिषद कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथील गेट समोर तक्रारदार यांच्या कडून 10,000/-रुपये लाच रक्कम पंच साक्षीदार यांच्या समक्ष स्वीकारल्यानंतर पंचासमक्ष सापळा पथकाने ताब्यात घेतले.<br>नमुद आरोपी यांच्या विरुध्द क्रांतीचौक पोलीस स्टेशन छत्रपती संभाजीनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. सदर सापळा कारवाई ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर यांनी केली असुन पुढील तपास ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर घटक करणार आहे. |

सदर कार्यवाही पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी केदार कांगणे, पोलीस उप अधीक्षक श्री राजीव तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस निरिक्षक श्री.चैनसिंग गुसिंगे यांनी केली आहे. त्यांना सदर कार्यवाही कामी पोह. राजेंद्र नंदिले, पो.अंम.सचिन बारसे, रामेश्वर ताठे ला. प्र. वि. छत्रपती संभाजीनगर यांनी मदत केली.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जुना बाजार, छत्रपती संभाजीनगर
ई- मेल :-1)spacbaurangabad@mahapolice.gov.in 2) dysp.acbcsn@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
पोलीस अधीक्षक :- 90110 92777 अपर पोलीस अधीक्षक :- 9923102205
पोलीस उप अधीक्षक :- 9823498777 व्हॉट्सअप क्रमांक :- 7720891064

**( राजीव तळेकर )**
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
छत्रपती संभाजीनगर.